# नाशिक महानगरपालिका, नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, पोस्ट बॉक्स नं. १२, नाशिक ४२२ ००२.

Visit us at : WWW.nashikcorporation.in E- mail: nashikcorporation@nashikcorporation.in

पी.बी.एक्स. : २५७५६३१, २५७५६३२, २५७७९२१, २५७७९२३
२५७१४७९, २५७१८७२ Fax : (०२५३) : २५७७९३६.


गोदावरी संवर्धन कक्ष विभाग
जा.क्र.मनपा/ गो.सं.क /कार्या-२/९५/२०२३
दिनांक :- ०९/०२/२०२३

प्रति,
मा.विभागीय आयुक्त सो.
नाशिक

**विषय**:- मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका क्र. १७६/२०१२ मधील दि. १८/१२/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश..

**संदर्भ**:- १. मा. विभागीय आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४/१०/२०२२ रोजीची जनहित याचिका क्र. १७६/२०१२ बैठकीतील सुचना.

**मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखालील समितीने दि.१४/१०/२०२२ रोजी बैठक आयोजीत केली होती. सदर बैठकीत मा.विभागीय आयुक्त सो. नाशिक यांनी नाशिक महानगरपालिका उपसमितीतील सर्व सदस्यांनी गोदावरी व तिच्या उपनद्यांची संयुक्त पाहणी दौरा करण्यात यावा असे आदेशीत केले आहे.**

त्या प्रमाणे दि. **१६ / १२ /२०२२ रोजी दुपारी २.३० मि. वाजता** पाहणी दौऱ्याकरीता खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

NEERI चे प्रतिनिधी
मा. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
मा. अध्यक्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, नाशिक
मा. उपआयुक्त (गो.सं.क),मनपा,नाशिक - **सचिव**
मा.अधिक्षक अभियंता, सा.बा.वि. मनपा,नाशिक - **निमंत्रीत सदस्य**
मा.अधिक्षक अभियंता, साआअ(मलनिः) मनपा, नाशिक - **निमंत्रीत सदस्य**
मा.अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), मनपा, नाशिक - ---"---"---
संचालक, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, नाशिक - ---"---"---
मा.कार्यकारी अभियंता पर्यावरण विभाग, मनपा, नाशिक - ---"---"------
श्री.राजेश पंडित - **अशासकिय सदस्य**
श्री.निशिकांत पगारे - ---"---"---

**पाहणी दौरा अहवाल खालीलप्रमाणे**

| अनु. क्र. | पाहणी स्थळ | पाहणी अहवाल/ खुलासा/ सूचना |
|---|---|---|
| १. | परीचा बाग, गंगापूर रोड | **श्री. निशिकांत पगारे यांनी वृत्तपत्रात परीचा बाग येथील नदीत सांडपाणी मिसळत असले बाबत तक्रार आली असल्याचे निदर्शनास आणून दिले त्या अनुषंगाने पाहणी केली असता सदर ठिकाणी गोदावरीच्या उजव्या तीरावरील मुख्य मलवाहिकेचे पाईप टाकण व चेंबर दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले व कामाकरिता तात्पुरते सांडपाणी नदीत वळविण्याचे आढळून आले. सदरहू काम तातडीने पुर्ण करणेबाबत मा.आयुक्त सो.यांनी आदेशीत केले.** |

आवक लिपीक
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक
नाशिकरोड, पिन-४२२१०१
9/2/2023

| | | |
|---|---|---|
| २. | रामवाडी पूल. आरसीसी वॉल बाबत | श्री.निशिकांत पगारे यांनी स्मार्ट सिटी मार्फत सुरू असलेल्या घाट सौंदर्यकरण अंतर्गत आरसीसी वॉल लगत नदीकाठी माती टाकली जात असले बाबत तक्रार केली आहे. त्या अनुषंगाने पाहणी दरम्यान आरसीसी वॉलच्या संरक्षणाच्या दृष्टिने माती टाकणे व मातीची धूप होऊ नये म्हणून त्यावर झाडे लावण्यात येत असल्याचे आढळून आले. पुढे मातीचा भराव वाढवूनये असे आदेश मा. आयुक्त सो. यांनी दिले. |
| ३. | रामवाडी पूल, लेंडी नाला | लेंडी नाला येथे पाहणी दरम्यान नाला अडविणे व वळविणेचे काम स्मार्ट सिटीमार्फत सुरु असल्याचे व नदीत सांडपाणी मिसळत नसल्याचे आढळून आले तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले. |
| 4) | तपोवन मलशुद्धीकरण केंद्र | श्री.राजेश पंडित यांनी केलेल्या तपोवन मलशुद्धीकरण केंद्रातून फेसयुक्त पाणी नदीपात्रात मिसळत असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने पाहणी झाली. सदर ठिकाणी फेस कमी करण्याचे दृष्टीने स्प्रिंकलर फवारे बसविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले. सदर बाबींची चर्चा होऊन मा.आयुक्त सो. यांनी फेस कमी होण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना सुचविणे बाबत निरीचे प्रतिनिधी यांना पत्र देऊन उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन मागविण्यात यावे असे आदेशीत केले आहे. |
| 5) | सुंदर नगर नाला नाशिक रोड | श्री.राजेश पंडित यांचे तक्रारी नुसार नाशिक रोड सुंदर नगर येथील नाल्यातील सांडपाणी वालदेवी नदीत मिसळत असलेल्या बाबतची पाहणी झाली. सदर ठिकाणी नाला अडविणे व वळविण्याची व्यवस्था उपलब्ध व कार्यान्वित असल्याचे आढळून आले. तसेच मलवाहीकेचे चेंबरला अज्ञात समाजकंटकांकडून नुकसान केल्याने काही प्रमाणात पाणी नदीपात्रात मिसळत आहे. सदरील नादुरुस्त चेंबरची दुरुस्ती आठ दिवसाच्या आत आरसीसी चेंबर बांधून करावी व नदीत मिसळणारे पाणी बंद करावे असे मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले आहे. |

उपरोक्त प्रमाणे उपसमितीतील सर्व सदस्यांनी गोदावरी व तिच्या उपनद्यांचा संयुक्त पाहणी दौरा संपन्न झाला.

(विजयकुमार मुंडे)
उपआयुक्त (गो .सं.क.)
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

**प्रत माहितीस्तव**
मा.आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका, नाशिक